अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

# महाराष्ट्रातल्या 'त्या' जातिवंतांची कायमची खोड मोडा

महाराष्ट्र दिनाच्या आदल्या दिवशीच पुरोगामी महाराष्ट्राला मान खाली घालायला लावणारी घटना घडावी हे महाराष्ट्राच्या प्रबोधन चळवळीचे सर्वात मोठे दुर्दैव ठरते. नगर जिल्ह्यामध्ये एका दलित युवकाची हत्या करून अजूनही महाराष्ट्र जातीयतेच्या जखमेने भळभळतो आहे. हे सिद्ध होते. उच्च वर्गाच्या जातीतील मुलीशी लग्न करण्याचे निमित्त जर या दलित युवकाच्या हत्येचे कारण असेल तर महाराष्ट्राच्या पासष्ट वर्षांच्या निर्मितीनंतरही इथली जातीयता इथल्याच राजकारणाने जोपासली आहे आणि समाजानेदेखील मनातल्या मनात कायम ठेवली आहे असे म्हणणे भाग पडते. मोलमजुरी करून राहणाऱ्या नगर जिल्ह्यातल्या जामखेड तालुक्यातल्या खर्डा गावच्या नितीन आगे या सतरा वर्षांच्या तरुणाची क्रौर्याची परिसीमा गाठून हत्या केली गेली आणि तिथेच मानवता नामशेष झाल्यासारखीच ठरली. त्याचे आई-वडील दगड फोडण्याचे काम करतात. तो स्वत: एका गॅरेजमध्ये काम करीत होता. त्याचा अर्थ त्याच्या घरामध्ये गरिबीचा पाठलाग नियतीने सोडलेला नव्हता. काबाडकष्ट करून जगण्याच्या सगळ्या वेदना सहन करून आजही महाराष्ट्राच्या ग्रामीण भागामध्ये लाखो कुटुंबे आसवांचे तापलेले कढ करून जगत आहेत. या वस्तुस्थितीकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. उच्च वर्गातल्या लोकांची इतक्या निर्घृणतेने एखाद्या तरुणाला मारण्याची हिंमत होते याचा अर्थ इथली जातीव्यवस्था अजूनही संपुष्टात आलेली नाही. उलट गावोगावी अजूनही हे जातीयतेचे निखारे समाजातल्या खालच्या वर्गाला भाजून काढत आहेत आणि या सगळ्या जातीयता जोपासणाऱ्या परिस्थितीला या देशातल्या म्हणा किंवा महाराष्ट्रात म्हणा राजकारण जबाबदार आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुता याची अमोल देणगी देण्याचे काम बाबासाहेबांपासून ते महात्मा ज्योतिबा फुलेंपर्यंत अनेकांनी केले. त्यांच्या नावाने सरकारी कागदपत्रांवर समतेचा उद्घोष केला जातो. अनेक योजनांचे कागदी घोडे पळवले जातात. परंतु हा सगळा देखावा ठरतो. महाराष्ट्रातल्या अठरापगड जातींच्या लोकव्यवहारात जातीची मगरमिठी निगरगट्टासारखी ठाण मांडून आहे. वरकरणी ती दिसत नसली तरी उच्च वर्गीयांच्या मनमनात आणि रोमारोमामध्ये ती तितकीच ठासून भरलेली पाहायला मिळते आणि त्याच्याच परिणामातून हा क्रौर्याचा कृतघ्नपणा केला गेला. या सगळ्या प्रकाराला जबाबदार कोण असा शेवटी प्रश्न उपस्थित होतोच. आपापसातल्या भांडणापासून ते वैयक्तिक रागलोभातून हा प्रकार घडल्याचे सांगितले जाते आहे. परंतु इथेदेखील पुन्हा एकदा जात लपवण्याचा आणि जात टिकवण्याचा प्रयत्न झाल्याशिवाय राहणार नाही.

## जातीयतेचे विष राजकारणातच जास्त

केवढी मोठी परंपरा असलेल्या या महाराष्ट्राच्या सुधारणावादी चळवळीला पूर्णपणे पराभूत करण्याचा प्रयत्न अजूनही काही जातिवंत लोक करीत असल्याचे दिसून येते. शहरामध्ये काही प्रमाणात जातीचा प्रभाव दिसत नाही. परंतु ग्रामीण भागात जात आणि भाषा या दोन्ही गोष्टी तपासूनच अनेक व्यवहार होतात. नुकत्याच लोकसभा निवडणुकांचे मतदान आटोपले, परंतु या निवडणुकांमध्येसुद्धा उमेदवारांच्या निवडीसाठी जातीचा, भाषेचा निकष लावला गेला, कोणत्या भागामध्ये कोणत्या जातीचे लोक जास्त राहतात. याची शहानिशा करून उमेदवार उभे केले गेले आणि अनेक ठिकाणी ग्रामीण भागात आपल्या जातीच्याच उमेदवाराला मत देण्याचे अलिखित फतवेही जारी केले गेले. ही गोष्ट केवळ लोकसभा निवडणुकीपुरती नाही तर ग्रामपंचायत निवडणुकीपासून ते थेट विधानसभा निवडणुकीपर्यंत एवढेच कशाला तालुका जिल्ह्याच्या ठिकाणी असणाऱ्या सहकारी साखर कारखान्यांच्या निवडणुका दूध उत्पादक संघाच्या निवडणुका किंवा शेतकऱ्यांना कर्जपुरवठा देणाऱ्या अगदी छोट्या स्वरूपातल्या विविध कार्यकारी सोसायट्याच्या निवडणुकांमध्येसुद्धा जातीला प्राधान्य दिले जाते. हा प्रकार कमीच होत नव्हता आणि म्हणून शेवटी कायद्याने काही जागा जातीनिहाय राखून ठेवण्याचा निर्णय शासनाला घ्यावा लागला. परंतु इथेसुद्धा जातीलाच जोपासले गेले. सत्तेसाठी खुर्चीसाठी आणि अगदी वैयक्तिक स्वार्थासाठी नेहमीच जातीला वेठीला धरले गेले हे आतापर्यंतच्या घटनांवरून सिद्ध होते. राजकारणाने जोपासलेली ही जातीयता जोपर्यंत पूर्णपणे नामशेष होत नाही तोपर्यंत खऱ्या अर्थाने समता प्रस्थापित होणार नाही. ज्यावेळेला आदिवासी भागामध्ये वेगळ्या जातीचा आणि शहरी भागामध्ये आदिवासी नेता निवडणूक लढवून जिंकून येत नाही तो कोणत्याही जातीचा असो पण आपला प्रतिनिधी म्हणून निवडून देण्याची प्रवृत्ती निर्माण होत नाही तोपर्यंत ही जातीयतेची विषवल्ली नामशेष होणार नाही.

## पुरोगामी विचारांनाच हादरा

बाबासाहेब आंबेडकर, राजर्षी शाहू महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, विठ्ठल रामजी शिंदे अशी कितीतरी नावे आहेत की, ज्यांनी समाजातल्या या जातीयतेच्या विषमतेला संपवण्यासाठी आपली आयुष्ये खर्ची घातली. तरीदेखील आज महाराष्ट्राच्या पासष्ट वर्षांच्या निर्मितीनंतर जातीयतेवरून इतके क्रौर्य घडत असेल तर आम्ही कोणता महाराष्ट्र घडवत आहोत आणि कोणता पुरोगामीपणा दाखवत आहोत, असा मुलभूत प्रश्न निर्माण होतो. राजकीय पुढाऱ्यांच्या हडेलहप्पीपणाच्या अनेक कथा सांगता येतील. परंतु जातीयता जोपासण्याचे काम कोणी केले असेल तर राजकारण्यांनी केले आहे. आज सरकारी कार्यालयांमध्ये, शाळांमध्ये इतर वेगवेगळ्या कंपन्यांमध्ये जेवढी जातीयता दिसणार नाही तितकी राजकारण्यांमध्ये ठासून भरलेली दिसेल, पुढारीपण करणाऱ्यांना आपल्या गावामध्ये इतकीदेखील समानता निर्माण करता येत नसेल, सामंजस्य प्रस्थापित करता येत नाही. यावरूनच इथले राजकारण आणि समाजकारण पराभूत झालेले आहे असेच म्हणावे लागते. ज्या क्रूरतेने महाराष्ट्राला अपमानित केलेले आहे ज्यांनी या क्रौर्याचे तांडव घातले त्यातल्या सगळ्यांना कठोर शिक्षा झाल्या पाहिजेत. भविष्यात पुन्हा कधीही जातीवरून अशा प्रकारची घटना घडणार नाही, असा धडा सगळ्याच महाराष्ट्राला मिळाला पाहिजे.